नि.फौ.ख.क्र.६४/२०१९
सरकार वि. अशोक
निशाणी ६४

अभियोगपक्षाचा साक्षीदार क्र. ०२ यांचा जबाब
मी शपथेवर निवेदन करते की,
माझे नावः अनुराधा रामकिसन कोठाळे
वयः ६३ वर्षे धंदाः शेती
रा. जैनपूर कोठारा ता. भोकरदन जि. जालना.

साक्षीदाराचा सरतपास अभियोगपक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. घाटे यांचे मार्फत

सविता माझी मुलगी आहे. तिचे लग्न आरोपी अशोक सोबत १० ते १२ वर्षापूर्वी गेवराई येथे झाले होते. लग्नानंतर ती गेवराई येथे सासरी नांदण्यास गेली होती. तिच्या सोबत सासरी सासू, सासरे , नणंद व सवत यशोदा राहात होते. लग्नानंतर सविताला मुलगी झाली होती व यशोदा हिला मुलगा झाला होता. सविताला मुलगी झाल्याने आरोपी तिला त्रास दयायचे. आरोपी तिला तु राहू नको असे म्हणून हाकलून दयायचे. ते सविताला जेवण देत नसत. सविताला आरोपी अशोक याने मारल्याने तक्रार देण्यासाठी वडोदबाजार पोलिस स्टेशन येथे ती गेली होती. सविताने पोलिस स्टेशनला तक्रार दिली होती. आरोपी अशोक याने सविताच्या उजव्या बाजूच्या स्तनाचा चावा घेतल्याने तिला जखम झाल्या होत्या. पोलिसांनी माझ्याकडे चौकशीकरुन माझा जबाब नोंदवला होता. पोलिसांनी मी सांगीतल्याप्रमाणे माझा जबाब नोंदवला होता. आजरोजी आरोपी अशोक न्यायालयात हजर आहे. इतर आरोपी गैरहजर आहे.

सरतपास पूर्ण.

उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. बी. यु. काळे यांच्या मार्फत -

२. मी अशिक्षित आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मुलीला बोलता व ऐकू येत नाही. ती मुकबधीर आहे. हे म्हणणे खरे आहे की, सविताला उजव्या बाजूच्या स्तनाला चावा व नखाने ओरखडल्याची जखम होतांना मी प्रत्यक्षात बघीतली नाही. हे म्हणणे खरे आहे की, तीने हातवारे सांगीतल्यानंतर मला समजते. हे म्हणणे खरे आहे की, घटना घडली त्यावेळी मी गवराई पायगा येथे नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, पोलिस स्टेशनला तक्रार माझ्या पतीने नोंदवली होती. साक्षीदार स्वत:हून सांगते की, सविता हीने इशा-याद्वारे पोलिसांना तक्रार सांगीतली होती. हे म्हणणे खरे आहे की, तक्रार देतेवेळी माझे पती पोलिस स्टेशनला सविता सोबत हजर होते.

३. सविता दोन ते तीन वर्षे नांदली होती.

प्र. सविता अशोकची दुसरी पत्नी आहे ?

उत्तर - सविता अशोकची तिसरी पत्नी आहे.

अशोकच्या दुस-या पत्नीचे नाव यशोदा असून पहिल्या पत्नीचे नाव मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, लग्नाच्या तीन ते चार वर्षानंतर माझ्या मुलीला मुलगा झाला आहे. हे म्हणणे खरे

आहे की,  सविताला मुलगा झाला त्यावेळेस गेवराई येथे सासरी होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने सविताला राहण्यासाठी एक रुम दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी अशोकने माझ्या मुलीच्या नावावर वीस गुंठे शेती केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, शेती सविताच्या नावावर आहे. हे म्हणणे खरे नाही की, सविता आरोपी अशोककडे नांदायला जाण्यासाठी हातवारे इशा-याने मला सांगते. आरोपीकडे तिला नांदण्यास जाण्यास भिती वाटते.

४. हे मला सांगता येणार नाही की, मी पोलिसांना जबाब देतवेळी माझ्या सरतपासातील मजकूर की, सविताला मुलगी झाली व यशोदाला मुलगा झाला म्हणून आरोपी सविताला त्रास दयायचा, हे सांगीतले होते किंवा नाही. हे म्हणणे खरे नाही की, सविता माझी मुलगी असल्याने तिला मदत करण्याकरीता आजरोजी खोटी साक्ष दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांना खोटा जबाब दिला.

उलट तपास पूर्ण.

फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

sd/-
**(धनंजय एस. देवरे)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र. २ फुलंब्री
दि.३०.०१.२०२५